## फी वाढ विरोधी आंदोलन ( पुणे विद्यापीठ )

## पार्श्वभुमी

जून 1969 मध्ये अचानक पुण्यामधील शिक्षणसंस्थानी 100 रुपये फी वाढ केली. (सध्याच्या काळानुसार 3000 रुपये ) या सगळ्या शिक्षणसंस्था राष्ट्रीय शिक्षणसंस्थांच्या ताब्यात होत्या.या फी वाढीमुळे समाजातिल आर्थीकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांवर कॉलेज शिक्षण सोडण्याची पाळी येणार होती.

युक्रांदची स्थापना नुकतिच झाली होती. तिची नाळ ग्रामीण व ब्राम्हणेतर विद्यार्थ्यांशी जोडली होती.त्यामुळे युक्रांदने अग्रहक्काने हा प्रश्न घ्यायचे ठरवले.डॉ. कुमार सप्तर्षी यांचा नुकताच आंतरजातिय विवाह झाला होता. त्यांच्यापुढे आर्थिक अडचणी होत्या. त्या बाजुला ठेवुन त्यानी चळवळीत झोकुन द्यायचे ठरवले.

**सुरुवात:**

20 जुन 1969 नंतर पुण्यातील क़ॉलेजमध्ये नविन शैक्षणीक वर्ष सुरु झाले. त्या अगोदरच डॉ. कुमार सप्तर्षी व त्यांच्या सर्व सहकार्यानी पुण्यामधील सर्व वसतीगृहे व क़ॉलेजेसना भेटी द्यायला सुरुवात केली. आंदोलन सत्याग्रही पध्द्तीने करायचे ठरवले होते.म्हणुन गांधीवादी सत्याग्रहाचे शास्त्र युक्रांदीयानी अभ्यासले. त्यातील सत्याग्रहाच्या अवस्था अभ्यासल्या

1. उदासिनता: प्रथम आंदोलन उदासिन अवस्थेत असते. ज्यांचा प्रश्न आहे हे वास्तव स्विकारुन काम चालु करायचे.
2. उपहास: ही सत्याग्रहाची दुसरी अवस्था असते. एकदा आंदोलनकर्त्यांचा उपहास चालु झाला की आंदोलन व आंदोलनकर्ते दखलपात्र झाल आहेत असे समजायचे.
3. निंदा: ही आंदोलनाची तिसरी अवस्था आहे.
4. दडपशाही: आंदोलनाच्या या अवस्थेत प्रस्थापीत दडपशाहीचे हत्यार उगारतात.
5. यश: एकदा दडपशाहीची अवस्था पार झाली की यश प्राप्त होते व त्याबरोबर आदर ही वाढतो.

दररोज युक्रांदीय आंदोलन कुठल्या पायरीवर आहे याचे शास्त्रशुद्ध परिक्षण करायचे. एकदा 100 ते 150 मुलांचा समुह तयार झाल्यावर पुण्यात कार्यरत असणाऱ्या विविध संघटनांची बैठक बोलावली. जवळपास 20 संघटनांचे प्रतिनिधी यात सहभागी झाले होते. या बैठकीत ‘विद्यार्थी आंदोलन कृती समिती’स्थापन करण्याचा निर्णय झाला. या बैठकीत कृती समितीचा सचीव म्हणुन डॉ. कुमार

समर्षीनी काम पहावे अशी आग्रही सुचना झाली व त्यानुसार डॉक्टरानी ती जबाबदारी घेतली.

**घटनाक्रम:**

11 जुलै 1969 रोजी कृतिसमितीने क़ॉलेज बंद व मोर्चाचा आदेश दिला.त्याआधी प्रत्येक क़ॉलेजवर गेट मीटींग्ज होउ लागल्या. फी वाढ निषेधाचे पोस्टर्स सर्वत्र दिसु लागले. युक्रांदियानी जहाल भाषणे करुन विद्यार्थ्यांच्यामधील वर्गीय जाणिवा चेतवायला सुरुवात केली. त्यामुळे विद्यार्थीवर्गामध्ये युक्रांदचे विचार लोकप्रिय होउ लागले. यामुळे संघपरिवारातील इतर संघटनानी युक्रांदबद्दल अपप्रचार करायल सुरुवात केली. विशेषतः डॉक्टराना मुख्य लक्ष्य की गेले. ठरल्यानुसार 11 जुलैला विद्यार्थीवर्ग उत्स्फुतपणे क़ॉलेज बंदच्या कार्यक्रमात सामील झाला. विद्यार्थ्यांचा मोठा मोर्चा निघाला. ज्यामध्ये फर्ग्युसन, गरवारे, एस. पी. या पुण्यामधील प्रमुख क़ॉलेजातील विद्यार्थी सहभागी झाले होते. मोर्चा मग अभिनव विद्यालयावर गेला.मग बाजिराव रोड, लक्ष्मी रोडने वाडिया क़ॉलेजवर विसर्जित झाला. संध्याकाळी टिळक स्मारक मंदिरावर सभा झाली. ज्यामध्ये प्रत्येक विद्यार्थी संघट्नेचा प्रतिनीधी बोलला. युक्रांदने या सभेमध्ये आंदोलन तीव्र करायचे आवाहन केले. जे विद्यार्थ्यानी त्वरीत उचलुन धरले.

परंतु दुसऱ्याच दिवशी अ.भा.वी.प. या संघप्रणीत संघटनेने 1 पत्रक प्रसिद्ध केले. ज्यामध्ये असे जाहिर केले की “युक्रांद ही संस्था समाजवादी आहे त्यामुळे तिला फी वाढ विरोधी कृतिसमिती मधुन काढुन टाकण्यात आले आहे.” यावर उत्तर म्हणुन पत्रकार परिषदेत युक्रांदने जाहीर केले “कृतिसमितीमधुन आम्ही युक्रांदला काढणार नाही अ.भा.वी.प. ला आंदोलन स्वतंत्रपणे चालवायचे असेल तर त्याला आमचा पाठींबा आहे. **युक्रांद समाजवादी आहे ही वस्तुस्थिती आहे व आम्हाला तिचा अभिमान आहे. ......**”

मधुनमधुन प्रत्येक क़ॉलेजवर फी वाढीची गरज काय? यावर जाहीर चर्चा चालायची. चौक सभा गेटसभा यांचा असाच गदारोळ उडाला होता.कोठारी आयोगाच्या
शिफारसीमधील पुरोगामी विचाराचे उतारे पुट्ठ्यावर लावुन क़ॉलेजमध्ये प्रसिद्ध करायचो.या सर्व उपक्रमामुळे विदयार्थी वर्गाची बाजु रास्त आहे हे सर्वाना पटत जायचे.आणि मगच सत्याग्रहाचा निर्णय झाला.

क़ॉलेजसमोर सभा व्हायची. पुर्ण गर्दीसमोर सत्याग्रही उभा रहायचा, त्याची कौटुंबीक परिस्थीती सांगीतली जायची.तो ही फी वाढ सहन करु शकणार नाही हे विशद केले जायचे.तरीही शिक्षण हा त्याचा हक्क असुन तो ते घेणारच हे बजावले जायचे.यानंतर ताठ मानेने तो विद्यार्थी क़ॉलेजमध्ये प्रवेश करायला जायचा.खुद्द पोलीससुद्धा स्वतःहुन अटक करत नसत. परंतु प्राचार्यच अटक करायला सांगायचे.अशावेळी विद्यार्थी रस्त्यावर हात बांधुन बसायचा "माझ्या शरीरावर तुमची मालकी चालेल परंतु मनावर तुमची मालकी नाही. मी स्वतःहुन पोलीसांच्या गाडीत बसणार नाही." असे निवेदन करायचा. मग 4-5 पोलीस त्या विद्यार्थ्याला गाडीत ठेवायचे. तो विद्यार्थी हीरो बनायचा. 15 विद्यार्थ्यांपासुन सुरुवात झाली व आठवड्याअखेर संख्या 75 ते 80 झाली.दिवसभर डेक्कन जिमखाना पोलीस चौकीवर ठेवले जायचे व रात्री सुटका व्हायची. याच्यात सामान्य विद्यार्थ्याचा अहिंसक पुरुषार्थ जागृत व्हायचा.

हा सत्याग्रह कार्यक्रम क़ॉलेज मॅनेजमेंटसना डोकेदुखी झाला होता. आणी काहितरी हिंसक घटना घडुन आंदोलन अपयशी व्हावे अशी त्यांची इच्छा होती. म्हणुन त्यानी नव्याने स्थापन झालेल्या पतित पावन संघटनेचा वापर करायचे ठरवले. जुलै महिन्याच्या 24-25 तारखेला गरवारे क़ॉलेजवर 1 मिटींग आटोपुन डॉ. कुमार सप्तर्षी फर्ग्युसन क़ॉलेजकडे चालले होते. अचानक सध्या ज्या ठिकाणी हॉटेल रुपाली आहे तेथील बोळातुन 10-15 जण डॉक्टरांच्या अंगावर धावुन आले.बदाबदा लाथाबुक्क्या घालु लागले.हे सर्व मिनिटभरात घडले. तेवढ्यात फर्ग्युसन क़ॉलेजकडुन विद्यार्थ्यांचा 1 घोळका धावत आला.मारहाण करणारा गट पळुन गेला. डॉक्टराना लोकानी उचलुन हॉटेलमध्ये न्हेले. तेथे पत्रकार आणि पोलीस आले. त्यावेळी डॉक्टर प्रचंड रागावलेले होते.पण सत्याग्रहाची तत्वे लक्षात ठेवुन डॉक्टरानी निवेदन दिले. "युक्रांदने हाती घेतलेला प्रश्न बहुतांश लोकाना पटवु शकलो आहोत परंतु काही लोकांच्या हृद्यापर्यंत पोचायला माझी आत्मशक्ती कमी पडली.म्हणुन आत्मशक्ती वाढवण्याच्या हेतुने आत्मचिंतनार्थ उपोषण सुरु केले आहे.सर्वानी शांतता पाळावी असे आवाहन मी करत आहे.". या उपोषणानमुळे पुन्हा एकदा विद्यार्थी वर्गातील फुट टळली गेली. समाजातील अनेक थरातुन लोक भेटिस येउ लागले. सर्वत्र युक्रांद व आंदोलनाबाबत सहानुभुतीचे वातावरण निर्माण झाले. क़ॉलेज मॅनेजमेंटसबद्दल आतिशय वाईट मत बनले. फुट पाडण्याचे व मारामाऱ्या

करण्याच त्यांचे डावपेच निष्फळ ठरले.डॉक्टर. कुमार सप्तर्षी यांच्या उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी क़ॉलेज मॅनेजमेंटसची एकत्र बैठक झाली व त्यात फी वाढ रद्द झाल्याची घोषणा केली गेली. आंदोलन 100% यशस्वी झाले.

**आंदोलनाची उप्लब्धी:**

1. अहिंसक लढाउपणा हा वैशिष्ठ्यपुर्ण फ़ॉर्म महाराष्ट्रातील क़ॉलेज विद्यार्थ्यांना अत्यंत अनुरुप वाटला.

2. युवक क्रांती दल ही संस्था महाराष्ट्रात रुजली.

3. ग्रामीण मागास विद्यार्थ्यांच्या वेदनाना युक्रांद वाचा फोडते म्हणुन क़ॉलेजमध्ये मोठ्या कष्टाने आलेला हा विद्यार्थीवर्ग ठिकठीकाणी युक्रांदच्या केंद्राची स्थापना करण्यात सहभागी होउ लागला.

4.दलीत विद्यार्थ्यांच्या वेदनाना शब्द देणारे युक्रांदमधील जातीमुक्त सवर्णच असल्यामुळे सवर्ण- दलीत ही मानसीक दरी कमी होण्यास मदत झाली.

5. म. गांधींच्या विचारांचा अभ्यास केल्यावर सत्याग्रहामध्ये कमीत कमी हानीमध्ये जास्तीत जास्त यश हमखास लाभते. हे मनोमन मानणारा कार्यकर्त्यांचा वर्ग निर्माण व्हायला या आंदोलनानंतर सुरुवात झाली.

6.समाजवादी पक्षातील निरंतर फुटीमुळे त्यावेळच्या क़ॉलेज तरुणांमध्ये समाजवादी हा उपहासाचा थट्टेचा विषय होता.या आंदोलनानंतर क़ॉलेज तरुण समाजवाद गांधीवाद या विषयाकडे आदरान पाहु लागले. “**होय मी समाजवादी आहे**” हे वाक्य ताठ मानेने बोलणारे कार्यकर्ते युक्रांदच्या फी वाढ चळवळीनंतर क़ॉलेज विदयार्थ्यांच्यामध्ये आढळु लागले.